ISSN 2394-5303



# प्रिंटिंग एरिया®

Peer Reviewed International Refereed Research Journal

Revised Edition

Editor
Dr.Bapu G.Gholap

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

**Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages**

**July 2022, Issue-91, Vol-02**

**Editor**

**Dr. Bapu g. Gholap**

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

14) समाजक्रांतीकारक—महात्मा जोतिराव फुले
प्रा अंशुमती राजेंद्र काहाणे, जि. अमरावती ||73

15) सातवाहन कालीन स्तूप वास्तुकला
डॉ. रमाकांत शिवाजीराव शातलवार, जि. हिंगोली ||77

16) अनुसूचित जाति के परंपरागत व्यवसाय का अध्ययन (अल्मोड़ा जनपद के संदर्भ में)
नरेन्द्र प्रसाद आर्या, अल्मोड़ा ||79

17) वाग्गेयकार पं.रामाश्रय झा एवं उनकी रचनाएँ
अमित कुमार, दिल्ली ||81

18) मध्यप्रदेश में महिला सशक्तिकरण के माध्यम से नवीन पंचायतीराज व्यवस्था : ...
अमित यादव & डॉ. डी.के. वाजपेयी, ग्वालियर (म.प्र.) ||85

19) भारतीय राष्ट्रीय आन्दोलन में स्त्रियों की सहभागिता
डौली कुमार, दरभंगा ||88

20) महर्षि पतंजली का योग दर्शन
नीतिश कुमार जायसवाल, मधेपुरा ||95

21) आधुनिक भारत में सामाजिक राजनीतिक क्षेत्र में पुलिश की भूमिका
डिलीप कुमार, मधेपुरा ||97

22) अनुसूचित जातियों के राजनीतिक नेतृत्व में आने वाली समस्याएं:एक ...
डॉ. संजय कुमार & कुलदीप, मेरठ ||101

23) तुलसीदास की दृष्टि में नारी
डॉ. प्रेरणा माहेश्वरी, बीकानेर ||106

24) योग : आदियुग से मोदी युग तक
सोनपाल सिंह मावी, मेरठ ||110

25) तीज—त्यौहार एवं लोकगीत : एक ऐतिहासिक विश्लेषण
मोनिका, मुजफ्फरनगर ||115

26) बरेली जनपद के उच्च प्राथमिक विद्यालयों में अध्ययनरत् विद्यार्थियों तथा उनके ...
निदा नकवी, बरेली, उ०प्र० ||123

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

मोजणे पूर्ण झाल्यानंतर विविध कृतिदल सक्रिय कार्य करू शकतात/करतात.

**कृतिदल** —१.शोध व बचाव कृतिदल, २. प्रथमोपचार कृतिदल, ३. आग सुरक्षा कृतिदल/ अग्निशामक कृतिदल, ४. इमारत खाली करण्याचा मार्ग, ५. शिक्षकांना मार्गदर्शन कार्यक्रम, ६. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन कार्यक्रम, ७. अनुभवी व्यक्तीची मदत, ८. प्रशासकीय मदत, ९. इतर

**निरीक्षणे** —१. भूकंप सराव/व्यायाम पटकन खाली वाकणे, लपणे, धरून ठेवणे., २. इमारत खाली केल्यानंतर एकत्र जमा होणे/गोळा होणे., ३. हरवलेल्या विद्यार्थ्यांची सुटका आणि जलद शोध करणे/जलद शोधकार्य आणि हरवलेल्या/राहिलेल्या/संकटात सापडलेल्या विद्यार्थ्यांची सुटका.

**समारोप** —

रंगीत तालीम ही शिक्षकांना, विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरावी व त्यांना प्रेरणा देऊन व आपत्ती व्यवस्थापनाला बळकटी निर्माण होण्यासाठी प्रयत्न करावेत, शाळा सुरक्षेच्या दृष्टीने रंगीत तालीम घेणे, त्याची तयारी करणे, वेळोवेळी आपत्तीविषयक निराकरण उपक्रमांचे आयोजन करणे, शाळेच्या भवितव्याच्या दृष्टीने व आपल्या सर्वांच्या सुरक्षेसाठी महत्त्वपूर्ण आहे.

**संदर्भ ग्रंथसूची** —

१. भितांडे वि.रा. शैक्षणिक संशोधन पद्धती (१९९९) नूतन प्रकाशन, पुणे.

२. मुळे, रा.शं., उमाठे वि.तु., शैक्षणिक संशोधनातील मूलतत्वे(१९८७), महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, पुणे.

३. डॉ. पाटील सतीश यू. आपत्ती व्यवस्थापन काळाची गरज, साप्ताहिक आहिल्यादेवी संदेश.

४. डॉ. पाटील सतीश यू. विज्ञान व तंत्रज्ञान कार्यपुस्तिका, प्रगती बुक्स प्रा.लि. पुणे.

५. डॉ. पाटील सतीश यू. शैक्षणिक आंतरवासिता — एक दृष्टीक्षेप, निराली प्रकाशन, पुणे.

६. डॉ. पाटील सतीश यू. आपत्ती व्यवस्थापन संशोधन पेपर, धुळे

७. डॉ. पाटील सतीश यू. डोईजड बाबाराव, शैक्षणिक व्यवस्थापन व प्रशासन आणि आपत्ती व्यस्थापन, निराली प्रकाशन पुणे.

८. डॉ. पाटील सतीश यू. रंगीत तालीम, पॉवर पॉइंट प्रेझेन्टेशन.

**14**

# समाजक्रांतीकारक—महात्मा जोतिराव फुले

**प्रा अंशुमती राजेंद्र काहाणे**
मराठी विभाग प्रमुख (सहयोगी प्राध्यापिका),
श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती

**********

**प्रस्तावना—**

समता, बंधुभाव, स्वातंत्र्य आणि शिक्षणाची ज्योत प्रज्वलित करणारे देशातील सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा जोतिबा फुले हे भारताचे खऱ्या अर्थाने क्रांतिज्योती ठरले. एकोणिसाव्या शतकात होऊन गेलेल्या या महापुरूषाने प्रज्वलित केलेल्या ज्ञानाच्या,समतेच्या ज्योतीने अज्ञानी समाजाला मानवतेचा मार्ग दाखविला. अंधश्रध्दा, रूढी—परंपरा, अनिष्ठ चाली—रिती मध्ये अडकून पडलेल्या समाजाला बाहेर काढले. अज्ञानाविरूध्द बंड उभारून समतेचा, माणुसकीचा, बंधूत्वाचा घोष करीत खऱ्या माणुसकी—धर्माचे आपाल्या आचार—विचारांतून दर्शन घडविले.

म.जोतिराव फुल्यांनी आपले विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवून दाखविले मानवी समतेची घोषणा करणारे पहिले लोकनेते, सामान्य जनतेच्या दैन्याला, दु:खाला वाचा फोडणारे पहिले महात्मा, आधुनिक भारतातील स्त्री—शिक्षणाचे जनक, अषा अनेक अर्थांनी जोतिराव फुले हे परिचित आहेत.

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीचा भक्कम पाया महात्मा फुल्यांनीच घातला. अनेक थोर विभूतींनी महाराष्ट्राच्या आणि देशाच्या प्रगतीला हातभार लावला हे खरेच ; परंतु ज्या काळात जोतिरावांनी बंड उभारून समाजाला खरा मार्ग दाखविला, हे त्याचे कार्य अपूर्वच होय. त्यांची विचारसरणी क्रांतिकारक होती.

प्रस्तूत शोध निंबधातून महाराष्ट्रातील समाज सुधारकांच्या पहिल्या पिढीतील श्रेष्ठ समाजसुधारक आणि

विशेषत: समाजातील श्रमजीवी वर्गाच्या शोषणाची व सामाजिक दास्याची मीमांसा करणारा क्रांतिकारक विचारवंत म्हणून फुले यांचा परिचय करून

देऊन त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**जोतिरावांचा अल्प परिचय**

महाराष्ट्रातील समाजससुधाराकांच्या पहिल्या पिढीतील श्रेष्ठ समाजसुधारक आणि विषेशत: समाजातील श्रमजीवी वर्गाच्या शोषणाची व सामाजिक दास्याची मीमांसा करणारा क्रांतिकारक विचारवंत म्हणून फुले विशेष प्रसिध्द आहेत. सावतामाळी समाजातील गोंविदराव शेटिबा फुले आणि चिमणाबाई या दांम्पत्याचे जोतीराव हे दुसरे अपत्य, लहानपणीच आई निवर्तल्यामुळे त्यांच्या पालनपोषणाचा सर्व भार वडिलांवरच पडला. जोतीरावांना इंग्रजी शिक्षणाचे वेध लागले होते. त्यांत अनेक अडचणी आल्या शालांत परीक्षेइतके इंग्रजी शिक्षण त्यांनी पूर्ण केले. इंग्रजीतील उच्चदर्जाचे ग्रंथ समजण्याची पात्रता तसेच इंग्रजीत लेखन करण्याची क्षमताही त्यांनी प्राप्त करून घेतली. बौध्दिक शिक्षणाबरोबरच त्यांनी शारिरिक शिक्षण घेतले. लहुजीबुवा मांग यांच्याजवळ दांडपट्टा षिकले मल्लविद्या संपादन केली. १८४० मध्ये त्यांचा विवाह खंडोजी नेवसे पाटील यांची कन्या सावित्री हिच्याशी झाला. सावित्रीबाईचे शिक्षण जोतीरावांनी पूर्ण केले. जोतीरावांच्या समाजसुधारणेच्या आणि लोकाशिक्षणाच्या कामात जन्मभर त्या सहभागी राहिल्या. जगाचा पश्चिमी देषांचा व विशेषत: भारताचा प्राचीन, अर्वाचीन इतिहास त्यांनी इंग्रजीतून सखोल वाचला. त्यांचे मनन केले. संस्कृत ग्रंथही त्यांनी वाचले. वेद, स्मृती, पुराणे यांच्यातील कथांचा त्यांनी अभ्यास केला. अश्वघोषाच्या नावावर प्रसिध्द असलेले वज्रसवी हे उपनिषद् त्यांना फार आवडले. त्यात अनेक ब्राहम्ण ऋषिमुनींचे कूळ हे ब्राहम्ण नव्हते हे सांगितले आहे. जातिभेद हा खोटा आहे. हे तत्व स्पष्ट रितीने मांडले आहे. कबीराच्या विचारसरणीचा प्रभाव त्यांच्यावर पडला होता. अशा मनन—चिंतनाने त्यांची स्वत:ची भारतीय समाजक्रांतीची विचार सरणी तयार झाली.

महात्मा जोतीराव फुले यांनी अनेक ग्रंथाची निर्मिती केली 'सत्यशोधक समाज' नावाची संस्था स्थापन केली. फुले यांचे ब्राहम्णांचे कसब, गुलामगिरी, शेतकऱ्याचा असूड, सार्वजनिक सत्यधर्म इ. ग्रंथ प्रसिध्द आणि महत्वपूर्ण आहे. पेतकरी आणि बहुजन समाजाच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेऊन पुरोगामी विचाराची मांडणी केली. समाजातील दिनदुबळयांच्या उध्दारासाठी त्यांनी लोकसेवेला आपले संपूर्ण जीवन वाहून घेतले. जनतेने त्यांना 'महात्मा' ही उपाधी बहाल केली.

**स्त्रिया आणि शूद्र यांचे शिक्षण—**

म. जोतीराव फुल्यांनी पहिला महत्वाचा कार्यक्रम ठरविला तो म्हणजे शिक्षण हिंदू समाजातील स्त्रिया व शूद्र या दोघांनाही आधुनिक ज्ञान प्राप्त व्हावयास पाहिजे याची त्यांना निश्चिती झाली. स्त्रीशिक्षणाच्या बाबतीत जोतीरावांनी युगप्रवर्तक कार्य केले हे निर्विवाद सत्य आहे. स्त्री पुरूषांपेक्षा श्रेष्ठ आहे. 'गुरूणा माता गरीयसी' या वचनाची थोरवी त्यांना पटली होती. भारतीय परंपरेने स्त्री शुद्रास एकाच दावणीत बांधून स्त्रियांना शिक्षणापासून वंचित केले होते. त्यांना अज्ञान अंधकारात पिचत ठेवले होते. जोतीरावांनी भारतीय स्त्री, शुद्रास शिक्षणाचे दरवाजे खुले व्हावे म्हणून सर्वप्रथम जीवाचे रान केले. त्यांनी आपल्या पत्नी सावित्रीबाई यांना शिक्षण घ्यावयाची प्रेरणा दिली. त्या शिकल्या व कनिष्ठ वर्गातील मुलींसाठी त्यांनी शाळा उघडली जोतिबांची शाळा बुधवार पेठेतील भिडे वाडयात ऑगस्ट १८४८ मध्ये सुरू झाली, ही शाळा महार—मांग चांभारादी अस्पृष्यांच्या मुलींनाही प्रवेश देत होती. सगळा हिंदू समाजच परंपरेच्या अंधश्रध्देत जखडला गेलेला. "स्त्रिया शिकल्या तर उच्चनीच जातींची समाजसंस्था डळमळीत होईल, अशी भीती ब्राहम्णांना व जातीप्रमुखांना वाटत होती, स्त्री शिकली की कुमार्गास लागून सुखाचे वाटोळे करील. स्त्रीला शिक्षण देणे म्हणजे वेडयाच्या हाती कोलीत देण्यासारखे आहे. असे वाटे. शिक्षणाच्या योगाने कौटुंबिक जीवनात एकमेकांच्या मर्यादा पाळण्याची प्रवृती राहणार नाही. अषी ही विचारपध्दती जीवनाला बंधनाने जखडून टाकणारी होती.[१]

अशाकाळात जोतीरावांनीच उभ्या भारतात स्त्री शूद्रांच्या उध्दार कार्याचा श्रीगणेशा केला. समाजसुधारणेचा असा हा गजर प्रथम महाराष्ट्रात झाला. त्यांच्या या कार्यारंभाने महाराष्ट्रात नवयुगाची सुप्रभात झाली. एवढेच नव्हे, तर त्यातूनच भारतीय समाजक्रांतीला प्रारंभ झाला असे म्हणणेच योग्य ठरेल. 'शिक्षण हा समाजक्रांतीचा पाया आहे.' असे कर्मवीर भाऊराव पाटील म्हणत असत. जोतीराव फुले यांनी याच विचारांची प्रत्यक्ष कृती केली.

शिक्षणाचे महत्व सांगणारे अत्यंत ऱ्हदयस्पर्शी विचार प्रथम जोतीराव फुले यांनी मांडले

'विद्येविना मती गेली! मतीविना निती गेली!
नितीविना गती गेली! गतीविना वित्त गेले !
वित्तविना शूद्र खचले! इतके सारे अनर्थ !
एका अविद्येने केले.'[२]

शिक्षणाअभावी देशातील बहूजनांची कशी वाईट अवस्था झालेली आहे. याचे विदारक चित्र प्रथम जोतीराव फुले यांनी मांडले. आणि एका वर्षातच २० शाळा सुरू केल्या. त्यांच्या या शैक्षणिक कार्यात विष्णुपंत थत्ते, वामनराव खडावकर, सगुणाबाई क्षीरसागर, फातिमा शेख इत्यादींनी शिक्षक म्हणून कार्य केले. फुलेंच्या शैक्षणिक कार्याची दखल ब्रिटीश सरकारने घेतली व सरकारच्या वतीने १६ नोंव्हेबर १८५२ रोजी पुण्याच्या विश्रामबाग वाडयासमोर ३००० लोकांच्या उपस्थितीत फुले दाम्पत्यांचा सत्कार करून गौरव केला होता.

**स्त्री उध्दाराचे कार्य**—वाईट प्रथा परंपरेच्या बेडयामध्ये बंदिस्त असलेल्या स्त्रियांच्या उध्दाराचे कार्य महात्मा जोतिबा फुले यांनी हाती घेतले. महाराष्ट्रात बालविवाह, विषमविवाह किंवा जरठ—बालविवाह मात्र सर्रास होत असत. अनेक विवाहित स्त्रियांना लहानपणी वैधव्य येणे हा त्या प्रथांचा अटळ परिणाम होता.

"१९०१ साली महाराष्ट्रात ब्राहम्ण विधवा स्त्रिया पाच वर्षाच्या आतील १५,५०० पंधरा वर्षाच्या आतील ३,२५,००० तर तिषीच्या आतील २,०५,५०० होत्या, या विधवा स्त्रियांचा त्यांच्या घरातील पुरूषांकडूनही खूप छळ होत असे. त्यांच्यावर गरोदरपण लादले जाई. आणि मग परस विहिरीत आत्महत्या करण्याशिवाय त्यांच्याजवळ दुसरा पर्याय नसे." ३ अशा स्त्रियांसाठी आणि अनैतिक संबंधातून जन्मास येणाऱ्या मुलांसाठी १८६२ साली दोन स्वतंत्र आश्रम जोतिरावांनी सुरू केले. विधवांची समाजातील दयनीय अवस्था पाहून फुले यांनी विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. स्वत: पुढाकार घेऊन विधवा पुनर्विवाह घडवून आणले. बालहत्या थांबविण्यासाठी त्यांनी आपल्या घरी 'बालहत्या प्रतिबंधक गृह' सुरू केले. या ठिकाणी कुमारी माता आणि विधवा स्त्रिया गुप्तपणे येऊन बाळंत होऊन मुलांना ठेवत असे. अशाच मुलांची जबाबदारी सांभाळणाऱ्या काशीबाई या ब्राहम्ण विधवेचा मुलगा यशवंत याला फुले दाम्पत्यांनी दत्तक घेतले व शिकवून डॉक्टर बनविले. नवरा मरताच विधवा झालेल्या अल्पवयीन बालिकेचेही केशवपन केल्या जात असे. या प्रथेला फुले यांनी विरोध केला. सावित्रीबाई यांनी पुढाकार घेऊन न्हाव्याचा संप घडवून आणला होता.

**अस्पृश्यांच्या उध्दाराचे कार्य—**

महात्मा फुले यांनी आपले संबंध आयुष्य समाजोध्दरासाठी व्यथित केले. तत्कालीन समाजामध्ये त्यांनी अनेक प्रकारच्या सामाजिक सुधारणा घडवून आणल्या.जातीभेद व अस्पृश्यतेचा प्रश्न त्याकाळी बिकट बनलेला होता. अस्पृश्यता ही वंशपरंपरेने चालत आलेली अत्यंत वाईट प्रथा होती. उच्चवर्गीयाकडून अस्पृश्यांना अत्यंत हीन वागणूक दिली जात असे. कनिष्ठ वर्गातील लोकांमध्ये अज्ञान, अंधश्रध्दा, निरक्षरता दूर करण्यासाठी त्यांना माणूस म्हणून हक्क आणि अधिकार मिळवून देण्यासाठी फुले यांनी अस्पृश्यांच्या उध्दाराचे कार्य हाती घेतले. पेशवाईमध्ये झालेल्या अस्पृश्यतेच्या प्रकोपाची बीजे जशीच्या तशी होती. अस्पृश्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न जटिल बनला होता. त्यांच्या पिण्याच्या पाण्याचे अतोनात हाल होते. पाण्यासाठी त्यांना वणवण फिरावे व याचना करावी लागत होती. अस्पृश्यांचे हे हाल पाहून जोतीराव अस्वस्थ झाले. अस्पृश्यांविषयीच्या करूणेपोटीच त्यांनी आपल्या घरातील पाण्याची विहिर व हौद सार्वजनिक केला. या निर्णयामुळे त्यांना अनेक प्रकारच्या रोशांना सामोरे जावे लागले. परंतू ते डगमगले नाहीत. त्याकाळात त्यांनी घेतलेला हा निर्णय म्हणजे त्यांच्या धाडसी व क्रांतीकारी व्यक्तिमहत्वाची साक्ष देणारा आहे.

'कनिष्ठ वर्गातील लोकांचे अज्ञान, निरक्षरता दूषित पूर्वग्रह आणि जातिविषयक दृढबंधने ही दूर करून परंपरेच्या मानसिक गुलामगिरीतून व ब्राहम्णांच्या प्रभावातून कनिष्ठ वर्गाला मुक्त करावे असा त्यांचा विचार होता. त्यासाठी त्यांनी लेखन केले व पुस्तिका लिहिल्या. १८६२ साली त्यांनी 'गुलामगिरी' हा आपला ग्रंथ लिहिला.

जोतीरावांनी 'गुलामगिरी' या ग्रंथात आपल्या ग्रंथाचे प्रयोजन सांगितले आहे ते असे की—"ब्राहम्ण लोक तुम्हाला लुटुन खात आहेत, हे माझ्या शुद्र बांधवांना सांगण्याच्या हेतूने मी हा प्रस्तुत ग्रंथ लिहीत आहे."४

आपल्या मानवतावादी कार्याला बळदेण्यासाठी त्यांनी आपल्या लेखनीचा शस्त्राप्रमाणे वापर केला. 'गुलामगिरी' मधील संदेश आपणास भारतातील परंपरागत, ब्राहम्णप्रधान, धार्मिक व सामाजिक संस्कृतीच्या विरूद्ध उठाव करण्यास प्रेरित करतो. परंतू समोर असलेल्या परंपरागत समाजसंस्था नष्ट करून त्याजागी स्थापन करावयाच्या सामाजिक संस्था हया ज्या तत्वांवर आधारलेल्या असल्या पाहिजेत, ती तत्वे त्यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकात विषद करून सांगितली आहेत.

**शेतकऱ्यांसाठी केलेले कार्य—**

महात्मा फुले यांनी १८८३ मध्ये 'शेतकऱ्याचा असूड' नावाचा ग्रंथ लिहून त्यात शेतकऱ्यांच्या दिनवाण्या अवस्थेचे वर्णन केले आहे. इतकेच नव्हे तर शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी त्यांनी आधुनिक शेतीला प्राधान्य दिले. पशुपालन करणे, शेतीविशयक ज्ञानाची परीक्षा घेणे, उत्तम शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना बक्षीसे व प्रशस्तीपत्रक देऊन त्यांचा गुणगौरव करणे असा विचार प्रथम मांडणारे ते पहिले भारतीय समाज सुधारक होत. या संदर्भात तर्कतीर्थ लक्ष्मण जोशी म्हणतात, "जोतिरावांचा हा विचार म्हणजे मानवी स्वातंत्र्याकडे, समतेकडे नेणारा विचार होता. गुलामगिरीत त्यांचा संदेश भारतातील परंपरागत ब्राहम्णप्रधान, धार्मिक व सामाजिक संस्कृतिच्या विरूद्ध उठाव करण्यास प्रेरित करणारा विचार ठरतो." या वरून महात्मा जोतिराव फुले हे शेतकऱ्यांचे मोठे कैवारी होते हे लक्षात येते. राष्ट्राचा खरा पोशिंदा म्हणजे बळीराजा होय. परंतू आज याच बळीराजाचा बळी जाताना दिसतो आहे. अठरा विश्व दारिद्रियात जीवन जगताना दिसतो आहे. जमीनदार, सावकार, आणि ब्रिटीश सरकारच्या जुलमी व्यवस्थेत तो भरडला जात होता. भारताची आर्थिक नाडी ही शेती व्यवसायावरच आहे. परंतू शेतीमालाला कधीच योग्य भाव मिळत नाही. त्यातून शेतकऱ्यांची आर्थिक लूट त्यांना जीवन जगण्यास असाहय करणे यासारख्या गोष्टी सावकार, ब्रिटिश सरकार, धर्मगुरू यांच्याकडून मोठया प्रमाणात केल्या जातात. तसेच भारतीय शेती ही निसर्गाच्या लहरीवर असणारी शेती मानली जाते. सततचा दुष्काळ आणि सावकारी पाश यामुळे शेतकरी हा नेहमीच आर्थिक विशमतेत अडकलेला दिसतो. अशा बळीराजाला या वाईट अवस्थेतून बाहेर काढण्यासाठी महात्मा जोतिराव फुले यांनी अतिशय कृतीशील स्वरूपाचे कार्य केले हे निर्विवाद सत्य आहे.

**धर्मविषयक कार्य—**

महात्मा फुले यांनी धर्माविषयी क्रांतीकारक विचार मांडले देव आणि भक्त यांच्यामध्ये मध्यस्थांची गरज नाही हे प्रखरपणे सांगितले. पारंपारिक रूढी, प्रथा, परंपरा या विरूद्ध त्यांनी विद्रोह केला. फुले म्हणतात, 'दगडाच्या मुर्तीवर फुले वाहून देव पावत नाही. स्वर्ग—नरक या गोष्टी पूर्णपणे काल्पानिक आहे. ब्राहम्णांनी आपल्या फायद्यासाठी धर्मग्रंथ तयार केले त्यामध्ये अनेक काल्पनिक बाबी आहेत.'[५] धर्माविरूध्द बोलण्यासाठी अतुलनीय धैर्य लागते. ते त्यांच्याजवळ होते, म्हणूनच त्यांच्या शब्दांना खऱ्या अर्थाने बळ प्राप्त झाले. ते धर्माविरूध्द परखडपणे बोलले आणि या धर्माच्या बंधनातून मुक्त होण्याचा शिक्षण हाच एक मार्ग आहे असेही त्यांनी सांगितले, 'स्वामी विवेकानंदानी एका ठिकाणी म्हटल्याप्रमाणे गोरगरिबांच्या सर्वांगीण उन्नतीकरिता शिक्षण आंदोलन भारतात पहिल्यांदा उभारणारे महात्मा जोतीराव फुले हे खऱ्या अर्थाने महात्मा आहेत.'[६] महात्मा फुले यांचे कार्य आजच्या काळातही कसे महत्वाचे आहे हे आपणास लक्षात घ्यावे लागते. पण त्याचबरोबर त्यांनी सूचित केलेल्या बऱ्याच बाबी करावयाच्या राहिल्या आहेत हेही पडताळून पहावे लागेल. तरच महात्मा फुले यांनी उभारलेल्या संघर्षाची पूर्ती होईल.

**निष्कर्ष**

१) समाजातील विषमता नष्ट करून समताधिष्ठित समाज निर्माण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला सामाजिक समतेच्या चळवळीचे ते आद्यप्रवर्तक होते.

२) स्त्रिया आणि अस्पृश्यांच्या उध्दारासाठी शिक्षणाचे दालन खुले करून दिले.

३) पारंपारिक धार्मिक विचाराला विरोध करून मानवतावादी धर्माचा प्रसार केला.

४) बहुजन समाजावर लादलेल्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक गुलामागिरीचे उच्चाटन करण्याचे कार्य महात्मा फुले यांनी केले.

५) क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले यांचे समता, बंधुता, न्याय व सामाजिक हक्क मिळवून देणारे हे कार्य प्रेरणा व मार्गदर्शन करणारे ठरले आहे

**संदर्भ ग्रंथ—**

१) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी — जोतिचरित्र पृ. १०—११


२) जोतिबा फुले — शेतकऱ्याचा असूड

३) म. जोतीराव फुले कृत (संपा) दादा गोरे — तृतीय रत्न पृ. ०९

४) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी —जोतिचरित्र पृ. २३—२४

५) धनंजय कीर —महात्मा फुले समग्र वाङ्मय

६) प्रा. इंगोले यु.पी. — फुले, शाहू, आंबेडकर शैक्षणिक विचार प्रवाह पृ.३२९,३३०




*Edit By*

Dr. Gholap Bapu Ganpat

Parli Vaijnath, Dist.Beed 431 515

(Maharashtra, India)

Cell : +91 75 88 05 76 95



*Publisher & Owner*

Archana Rajendra Ghodke

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed-431 126

(Maharashtra) Mob.09850203295

E-mail: vidyawarta@gmail.com

www.vidyawarta.com

₹ 400/-

ISSN 2394-5303